| | |
|---|---|
| **Date:** 20.12.2021 | **Publication:** Punya Nagari |
| **Page no.:** 2 | **Edition:** Nagpur \| Pune |
| **Headline:** Bajaj Allianz General Insurance launches wellness rider | |


# बजाज आलियान्झ जनरल इन्शुरन्सच्या वेलनेस रायडरची सुरुवात

**मुंबई** :बजाज आलियान्झ जनरल इन्शुरन्स या खाजगी क्षेत्रातील साधारण विमा कंपनीतर्फे त्यांच्या अनोख्या अशा 'हेल्थ प्लस रायडर' या योजनेची सुरुवात केली आहे. या रायडरचा उपयोग कंपनीच्या हेल्थ इन्शुरन्स आणि वैयक्तिक अपघात योजना या दोन्हींमध्ये करणे शक्य आहे. हे रायडर सुरू करण्यामागे ग्राहकांना सर्वसमावेश आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे ही संकल्पना आहे. या रायडरची सेवा अजोडपणे उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने कंपनीने बजाज फिनसर्व्ह हेल्थ लिमिटेड हेल्थटेक कंपनी बरोबर भागीदारी केली आहे. या अंतर्गत आता गाहकांना २५०० हून अधिक लॅब चेन्स आणि विविध स्पेशॅलिटीजच्या ९० हजार डॉक्टर्सची सुविधा उपलब्ध होणार असून ते आता बजाज आलियान्झ जनरल इन्शुरन्सच्या ग्राहकांना सेवा देतील. या अनोख्या पावलामुळे आरोग्य आणि वेलनेस क्षेत्रात एक अनोखे पाऊल उचलले गेले असून यामुळे देशात आता डिजिटायझेशनच्या शक्तीचा पूर्ण उपयोग होणार आहे.